# अभ्यास दोन




# येशुने काय शिकविले?

*वर आपले नांव लिहा आणि मोकळ्या जागी शास्त्र संदर्भ लिहा.*

## त्याने पापी लोकांसाठी देवाच्या प्रीतीबद्दल शिकवीले



एक चांगला शिक्षक

तुम्हाला आठवतं का तुमच्या शाळेत शिक्षक होते? कांही चांगले होते व तुम्ही त्यांच्याकडून बरेच कांही शिकलांत. येशु अतिशय चांगला शिक्षक होता.[१] तो वारंवार दाखल्यांचा वापर करून शिकवीत होता. दाखला म्हणजे एखादी गोष्ट ज्यामध्ये एक गर्भीत अर्थ असतो.

येशुचे तीन दाखले आपल्यासारख्या पापी लोकांची तुलना करतात ज्या हरवील्या होत्या व त्या पुनः आनंदाने सापडल्या.[२] या तीन्ही दाखल्यांचा अर्थ अगदी सरळ आहे. स्वर्गामध्ये आनंद व उल्हास होतो जेंव्हा हरवलेले पापी लोक देवाकडे "घरी" परततात.

### देव हरवलेल्या पापी लोकांना शोधतो

पहिला दाखला हरवलेल्या मेंढराचा आहे ज्याचा मेंढपाळाने शोध केला व त्याला ते सापडले. हा दाखला व त्यानंतरचा दाखला देव पापी लोकांचा शोध करत आहे पापी लोक देवाचा शोध करीत नाहीत.[३] लुक १५:३-७ वाचा. **वचन ६ लिहून काढा.**

..........................................

..........................................

..........................................

..........................................

एक हरवलेले मेंढरू सापडले

येशु त्या मेंढपाळासारखाच आहे. **लुक १९:१० लिहून काढा.**

..........................................

..........................................

### देव हरवलेल्या पापी लोकांचं स्वागत करतो

तीसरा दाखला अशा मुला बद्दल आहे जो अतिशय वाईट जीवन जगलाआहे. जेंव्हा त्याने त्याच्या पापांचा अंगीकार केला तेंव्हा त्याच्या वडीलांनी त्याचं स्वागत केले. तो मुलगा आपल्या जीवनात मार्ग चुकला होता. देव हा त्या दाखल्यामधील त्या वडीलांप्रमाणे आहे. जेंव्हा आपण आपली पापे कबूल करतो देव आनंदाने आमचे पुन्हा स्वागत करतो. **लुक १५:२१-२४ वाचा.**

एक हरवलेला पुत्र घरी परत येतो

..........................................

..........................................

..........................................

हा दाखला पश्चातापाबद्दल शिकवितो. पश्चाताप म्हणजे पापाचा त्याग करणे व देवाकडे पुन्हा वळणे. यावर आपण पुन्हा विचार करू जेंव्हा आपण अभ्यास ६ कडे येऊ तेंव्हा.

---

[१] येशुने अधिकाराने शिकवीले (लुक ४:३२) आणि त्याच्या विरोध्यांकडूनही त्यांचे कौतुक होत होत (लुक ४:२२).

[२] लुक १५:१-१७ (हरवलेले मेंढरू) ८-१० (हरवलेले नाणे) ११-३२ (उधळया पुत्र).

[३] जर देव पापी लोकांना शोधण्याची व त्यांचे तारण करण्याची निवड करीत नाही तर पापी लोक हरवलेलेच राहतील. इफिस १:४ पाहा.

आता त्याच्या शिकवणीच्या इतर गोष्टींकडे पाहूया.



आनंदाचे नियम

# त्याने देवाच्या नियमशास्त्राचे स्पष्टीकरण केले

मनुष्याच्या नियमांचा हेतू सुखी व आनंदी जीवन निर्माण करणे हाच असतो. जो नियम सांगतो की आम्ही रस्त्याच्या दुसऱ्या बाजुला रहा म्हणतो तो अपघात टाळतो व जे नियम चोरी करण्यापासून प्रतिबंध करतात ते आपल्या मालमत्तेचे रक्षण करतात. देवाचे नियम सुद्धा आपल्या सुखासाठी आहेत. परंतु देवाच्या गुणवत्तेची पातळी आपल्यापेक्षा कितीतरी उच्च आहे.

## येशुने शिकवीले की आपण परीपूर्ण असायलाच हवं

त्याने असे शिकवीले की आम्ही देवाप्रमाणेच चांगले असलो पाहीजे. हे आपल्याला अशक्य वाटेल व ते अशक्य आहेच परंतु मुलतः आमची निर्मीती देवाप्रमाणेच असावी अशी होती.
**मत्तय ५:४८ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .




## येशुने देवाच्या नियमांची व्याप्ती शिकवीली

त्याने दाखवून दिले की देवाचा नियम आपण जो विचार करतो व बोलतो त्याचप्रमाणे आपण जे बोलतो त्या सर्वांना व्यापून टाकतो.[४] **मत्तय ५:२८ लिहा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

## येशुने प्रीतीचे महत्त्व शिकवीले

शत्रूंसाठी प्रेम

येशुने म्हटले की ज्याप्रमाणे आम्ही देवावर व लोकांवर प्रीती केली तर आपण देवाचा नियम पाळू.[५] आपण असा विचार करू की आपण सर्वांवर प्रीती करतो परंतु काय आम्ही आपल्या शत्रूवर प्रीती करतो काय? **मत्तय ५:४४ लिहा**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .



तो कुसावर दुःख भोगणार होता!

# त्याने शिकवीले की आपण दुःख सहन केले पाहीजे

आपल्या सार्वांना ठाऊक आहे की आपल्याला एक दिवस मरावयाचे आहे. परंतु मरण्याच्या उद्देशाने आपला जन्म होत नाही. आपला जन्म होतो तो दिर्घकाळ जगण्यासाठी. मरण हे स्वागत न केलं जाणारं एक अतिक्रमण आहे!

उलटपक्षी येशु ख्रिस्त असा बोलत होता की मृत्यु हाच त्याच्या जन्माचा मुळ हेतु होता. त्याने आपला क्रूर मृत्यु कुसावर पाहीला एक असं मरण जे अतिशय अपमानास्पद मरणाचा अनुभव होता. ही एक अतिशय उल्लेखनीय भविष्यवाणी होती. येशु ख्रिस्ताप्रमाणे दयाळू माणसाला मारण्याची इच्छा कोण करू शकतो? त्याने हे सुद्धा भाकीत केले की मेल्यानंतर तीन दिवसांनी तो जिवंत होइल.

[४] मत्तय ५:२१-२२ आणि २७-२८.

[५] मत्तय २२:३६-४०.

## येशु म्हणाला की तो मरणाच्या उद्देशानेच जन्मास आला

मरणासाठी जन्मास आला

तो म्हणाला की त्याच्यासाठी मरणं आणि पुन्हा जिवंत होणं हे अतिशय आवश्यक होतं. ही गोष्ट त्याने आपल्या शिष्यांना तीन वेगवेगळया ठिकाणी सांगीतली.[६] **मत्तय १६:२१ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

## येशु म्हणाला तो आपल्या मेंढरांसाठी मरेल



एक पूर्वेकडील मेंढपाळ

येशुच्या दिवसांमध्ये एक चांगला मेंढपाळ लांडग्यांपासून आपल्या मेंढरांचं रक्षण करण्याकरीता आपला जीव धोक्यात घालत असे. येशु म्हणाला तो त्याच्या मेंढरांसाठी मरेल (म्हणजे विश्वासणारे). आपल्या मेंढरांच्या जागी तो मरेल. **योहान १०:११ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

शेवटी येशु म्हणाला त्याचं मरण "अनेकांच्या खंडणीसाठी" होतं.[७] मरण्यापूर्वी कांही तास अगोदर त्याने आपल्या शिष्यांना भाकर व द्राक्षारस यांचा एक प्रतिकात्मक धडा शिकवला. तो म्हणाला की द्राक्षारस व भाकर हे त्याच्या शरिराचे व रक्ताचे प्रतीक आहेत. शिष्यांना येशूच्या मरणांतीक प्रीतीची आठवण म्हणून कायमस्वरूपी घेण्याची आज्ञा दिली.[८]

# तो म्हणाला की तो न्याय करण्यासाठी परतणार आहे



चूक करणायाचा न्यायनिवाडा

जेंव्हा कायदा किंवा नियम असतात तेंव्हा ते मोडल्याबद्दल शासन देखील असतं. परंतु जे न्याय करणारे असतात ते स्वतः परीपूर्ण नसतात. आणि ते परीपूर्ण नाहीत म्हणूनच ते चूका करू शकतात जे निरपराध आहेत ते कांहीवेळेस दुःख सोसतात व गुन्हेगार सुटून जातो.

जगीक न्यायाधीश उघड पापांचा न्याय करतात जसं की चोरी दंगा करणे दंगलखोरी इत्यादी. परंतु जी पापं लपलेली आहेत जसं द्वेष अशूद्धता हावरटपणा हया सर्व पापांना मनुष्याद्वारे शिक्षा नाहीच. जर मनुष्याला अशा पापाबद्दल न्यायाधीश नेमलं तर त्याला स्वतःला पापविरहित असण्याची आवश्यकता आहे.

परीपूर्ण न्यायाथिश

देवाच्या दृष्टीमध्ये सर्व दुष्टपणा पाप आहे व ते पाप न्यायनिवाडयास योग्य आहे. परंतु तो उद्देश परीपूर्ण करण्याकरीता कोण पापविरहित आहे? योग्यरीतीने न्याय करण्याकरीता कोण परीपूर्ण आहे? आम्ही ज्याप्रकारे वागणूक करतो त्याप्रकारे का करतो किंवा ज्या परीस्थीतीमध्ये आम्ही तसे वागतो हे योग्यरीतीने समजण्यासाठी कोण समंजस आहे? येशु ख्रिस्तच केवळ त्यासाठी पात्र आहे कोणतीही साधारण व्यक्ती चांगली नाही. म्हणून तुम्ही येशुने ह्या विषयावर काय म्हटले हे समजून घ्या.

---

[६] मत्तय १६:२१, १७:२२-२३ आणि २०:१८-१९

[७] मार्क १०:४५ (अभ्यास ४ पाहा)

[८] लुक २२:१९-२०

## येशु म्हणाला की जगाचा न्यायाधीश म्हणून त्याची नेमणूक केली गेली आहे

एक महान सन्मान

येशु म्हणाला की हा महान सन्मान त्याला देवाने दिला आहे त्याचा देव पिता जो स्वर्गामध्ये आहे.
**योहान ५:२२-२३ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .




डैवी मानव गोष्टी दोन्ही बाजूंनी पहातो

येशु म्हणाला की तो "मनुष्याचा पुत्र" त्याचप्रमाणे "देवाचा पुत्र". हे म्हणताना त्याने स्वतःला पूर्ण मानव असे घोषीत केले. एक मानव या नात्याने तो मानवाच्या समस्या व संकटांना समजू शकतो. एक पापविरहित मनुष्य[९] तो अचूकरित्या समजू शकतो म्हणून तो अचूकरित्या न्याय करील.
**योहान ५:२६-२७ लिहून काढा.**

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

## येशु म्हणाला त्याच्या परतीच्या वेळी तो जगाचा न्याय करील

येशु पुन्हा येत आहे

येशु असं म्हणाला नाही की तो जगाचा तत्काळ न्याय करील. तो म्हणाला की जगाचा न्याय करण्यासाठी तो आला नाही परंतु जगाला तारावयास आला.[१०] परंतु त्याने अशा एका दिवसाबद्दल सांगीतले की तो जगाचा न्याय करण्यासाठी परत येणार आहे.
**मत्तय २५:३१-३२ लिहून काढा**

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

## आणि शेवटी

येशु ख्रिस्ताच्या बोलण्याचा अर्थ पुनर्जन्म नव्हता

येशु आंतरीक बदलाच्या गरजेविषयी बोलत असे जो केवळ देवाच्या आत्म्याद्वारेच येऊ शकतो. हा बदल इतका अमुलाग्र आहे की त्याची तुलना नविन जन्माबरोबर केली गेली आहे. या बदलाशिवाय तो म्हणाला की स्वर्गामध्ये प्रवेश करणे अशक्य आहे.[११] तुम्ही हा बदल अनुभवला आहे का? जर अनुभवलं असेल तर तुम्ही या अभ्यासामध्ये सांगीतलेल्या त्याच्या शिक्षणाचं अनुकरण कराल.

---

[९] अभ्यास ३ पाहा

[१०] योहान १२:४७

[११] योहान ३:३-५